महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 12 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 255 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# शहापूरमध्ये भीषण पाणी टंचाई





## टँकरने पाणीपुरवठा सुरु....

**जलजीवन कामे ठप्प**

**विहिरी व बोअरवेल आटल्या**

**३५ गाव पाड्यावर १५ टँकरने पाणीपुरवठा**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापुर तालुक्यातील विहिरीत खडखडाटशहापुरातील ग्रामीण भागात भूगर्भातील पाणी पातळी खालावली असल्याने बोअरवेल व विहिरीतील जलस्रोत आटल्याने दरवर्षी प्रमाणे भिषण पाणी टंचाई सुरू झाली आहे. तर येथील विहीर तसेच बोअरवेलच्या झऱ्यातून पाणी जमा होईपर्यंत महिलांना एक/दोन तास ताटकळत पाण्याची वाट पहावी लागत आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणारी तानसा, वैतरणा, भातसा, मध्यवैतरणा ही जलाशय शहापुरात असतांना देखील याठिकाणी भिषण पाणी टंचाई जानवत असुन धरण उशाला, कोरड घशाला अशी गंभीर परिस्थिती येथील नागरिकांची झाली आहे.. तालुक्यात जलस्वराज्य, भारत निर्माण व राष्ट्रीय पेयजल यासारख्या दोनशे योजना केवळ कागदावरच पुर्ण झाल्या असून सातत्याने या योजनेतून पाणीपुरवठा होत नाही त्यामुळे सद्यस्थितीतील जल जिवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे सुरू करून अर्धवट अवस्थेत बंद आहेत. योजनांची कामाची मुदत सन २०२३ मध्ये संपुष्टात आली असतांना देखील काही ठिकाणी ही कामे अतिशय धिम्यागतीने तर काही ठिकाणी बंद अवस्थेत आहेत.मात्र सर्व योजनांची कामे ही वनपरवानग्या, जागा निश्चित नसल्याने तसेच अपुरे कामांमुळे बारगळल्या आहेत. तालुक्यातील जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी संपूनही काही योजनेचे काम अर्धवट अवस्थेत ठप्प झाले असल्याने जलजीवन योजनेच्या'हर घर जल'योजनेलाच घरघर लागली असल्याने ही योजनाच पूर्ण होत नसल्याने ठिकठिकाणी स्थानिक रहिवाशांना तिव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने महिलावर्ग संताप व्यक्त करीत आहेत.बिल मिळत नसल्याने अंतिम टप्प्यात आलेल्या योजना पूर्ण करण्यास ठेकेदार टाळाटाळ करीत असून अधिकारी वर्गही हताश झाला आहे. ज्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी जलजीवन योजनेची कामे घेतली आहेत त्यांची कामांसाठी उसने पैसे घेतल्याने व दागिने गहाण ठेऊन कामे केल्याने आर्थिक कोंडी झाल्याने ते हवालदिल झाले असून शासनाने कामाचे बिल लवकरात लवकर अदा करावे यासाठी पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हेलपाटे मारून हैराण झाले आहेत. सद्यस्थितीत 11 पाडे व 35 गावांना 15 टँकरने पाणीपुरवठा सुरू असून जस जशी मागणी वाढेल त्याप्रमाणे टँकरने पाणीपुरवठा करण्यात येईल व भावली पाणीपुरवठा योजनेवर जलजीवन मिशनच्या 119 योजना मंजूर असून त्यापैकी 21 पूर्ण झाल्या आहेत तर 93 योजनाचे काम प्रगतीपथावर असून 5 योजना अजून तांत्रिक अडचणीमुळे सुरूच झाल्या नसल्याची माहिती विजया पांढरे यांनी दिली.

## संपादकीय

### पाण्यासाठी टाहो

**कुठे गेल्या जल जीवनच्या पाणी योजना ??**



मार्च महिन्याच्या सुरवातीलाच ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरु झाली आहे. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर तीच स्थिती असेल तर याला जबाबदार कोण? हा प्रश्न या स्थितीतून निर्माण होतो. हे चित्र, ही परस्थिती अनेक वर्ष सुरु आहे.पाणी टंचाई च्या नावाने तेच ते राजकारण रंगतय, आरोप प्रत्यारोप होतात. मात्र पावसाळा सुरु होताच, हे प्रश्न, या समस्या तशाच वाहत्या पाण्या सोबत वाहात जातात. पुन्हा उन्हाळा येतो, समस्या तीच, प्रश्न तेच पिण्यासाठी पाणी मिळेल का? पाणी? असा टाहो आज ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुरु आहे. मग करोडो रुपये खर्च करून उभारलेल्या जल जीवन च्या पाणी योजना आहेत कुठे? ना पाणी ना योजना? पैसे खाल्ले कोणी? अधिकाऱ्यांनी की प्रामाणिक कम खोटे काम करणाऱ्या ठेकेदारांनी? शहापूर तालुक्यात आज पिण्याचे पाणी टँकर ने पुरवले जात आहे. त्यासाठी काम करणारी लॉबी आपलं घबाड प्रतीवर्षी लाटत आहे. पाणी टंचाई ही त्यांच्यासाठी पर्वनी आहे. टंचाई आराखडा एक मलई दार आराखडा करणारा तूपाशी राबवणारा ही तुपाशी मस्तच ना. शहापूर तालुक्यात भावली धरणाच पाणी येईल या आशेत अनेकांनी वाट पहात टंचाईशी सामना केला. त्याच शहापूर तालुक्यात आजचे पाणी टँचाईची वास्तवता भयावाह आहे. मग अधिकारी डोळे झाकून पैसे वाटतात का? पाणी योजना भ्रस्ट कारभाराचा अड्डा झालाय काय चाललंय हो पाणी पुरवठा विभागात?






# बदलापुरात थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** थकीत मालमत्ता कराची वसूली करण्यासाठी कुळगाव बदलापूर नगरपालिका प्रशासनाने धडक कारवाई सुरू केली असून मंगळवारी ५२ मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. शहरातील थकबाकीदारांवर कारवाई करण्यासाठी पालिका प्रशासनाने पाच भरारी पथकांची स्थापना केली असून त्यांकडून सोमवारी ३६ लाखांची वसूली करण्यात आली.

कुळगाव बदलापूर नगरपालिका प्रशासनाने गेल्या काही दिवसांपासून आक्रमक पद्धतीने करवसुलीला सुरूवात केली आहे. कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रात १ लाख २३ हजार २७३ रहिवासी तर १४ हजार ३६५ वाणिज्य आणि ६४२ औद्योगिक अशा एकूण १ लाख ३८ हजार २८० मालमत्ताधारक आहेत. आर्थिक वर्ष २०२४-२५ या आर्थिक वर्षातील एकूण मागणी रक्कम ८१.८४ कोटी इतकी आहे. त्यापैकी नगरपरिषदेने जवळपास ५७.५९ कोटी इतकी वसुली केली आहे.अजूनही २४.२५ कोटी इतकी थकबाकी नगर पालिकेला येणे बाकी असून ते वसूल करणेकरिता विशेष वसुली मोहीम सोमवार १० मार्चपासून मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांनी सुरू केली. यासाठी ५ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली होती. या पथकांमार्फत थकीत मालमत्ता करधारकांच्या मालमत्ता जप्त करणे तसेच अटकावणी करण्याची कारवाई करण्यात येते आहे. सोमवारी भरारी पथकांनी ५२ मालमत्ताची जप्ती केली असून त्याचा थकीत मालमत्ता कर ६४ लाख १४ हजार ८९३ इतका आहे.

तसेच थकीत मालमता कराची भरारी पथकाद्वारे ३६ लाख ५१ हजार ३१०इतकी वसुली करण्यात आली आहे. कुळगाव बदलापूर नगर पालिकेच्या वतीने शहरातील मालमत्ताधारकांना थकीत मालमत्ता कर जमा करून नगर पालिकेला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



## आमदार किसन कथोरेंनी मानले अर्थमंत्र्यांचे आभार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री मा.ना.श्री. अजितदादा पवार साहेब यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात मुरबाड विधानसभा मतदारसंघातील माळशेज घाट येथे विव्हिंग गॅलरीला मंजुरी दिल्याबद्दल आज आदरणीय अजितदादा यांची विधान भवनातील त्यांच्या दालनात भेट घेऊन मतदार संघातील जनतेच्या वतीने मनापासून आभार मानले.

# जनकल्याण यात्रेचे ठाणे जिल्ह्यात स्वागत



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे,दि.11 : राज्याच्या विशेष सहाय्य विभाग यांच्या वतीने "जनकल्याण यात्रा 2025" चे आयोजन राज्यभर करण्यात आले आहे. या यात्रेच्या माध्यमातून विशेष सहाय्य विभागाच्या सर्व योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम मोबाईल एलईडी व्हॅनमार्फत राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये करण्यात येत आहे. या जनकल्याण यात्रेचा शुभारंभ विशेष सहाय्य विभागाचे मंत्री श्री.नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते नुकताच दिंडोरी, नाशिक येथे संपन्न झाला आहे. जनकल्याण यात्रेचे राज्यभर कार्यक्रम होत असून ठाणे जिल्ह्यामध्ये आज ही जनकल्याण यात्रा पोहोचली असून ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या यात्रेचे स्वागत निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, तहसिलदार (संजय गांधी योजना) संदीप थोरात, तहसिलदार मिरा-भाईंदर निलेश गौड व इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केले. यावेळी विशेष सहाय्य विभागाच्या योजनांवर आधारित दिग्दर्शक व निर्माता शंकर बारवे यांनी तयार केलेला माहितीपट मोबाईल एलईडी व्हॅनद्वारे दाखविण्यात आला. त्याचबरोबर योजनेची माहितीपत्रके लाभार्थ्यांना देऊन योजनेची माहिती देण्यात आली. या यात्रेदरम्यान मोबाईल एलईडी व्हॅनच्या माध्यमातून विशेष सहाय्य विभागाच्या योजनांची माहिती ठाणे जिल्ह्यातील सर्वसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यात येणार आहे.

विशेष सहाय्य विभागाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना या सहा मुख्य योजना राज्य शासन व केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजना आहेत. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांना डीबीटी पोर्टल द्वारे लाभाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते आधार संलग्न असणे आवश्यक आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी संबधित तहसील कार्यालय अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन विशेष सहाय्य विभागाचे मंत्री श्री.नरहरी झिरवाळ यांनी लघुपटाच्या माध्यमातून केले आहे.

# पालघरमधील रोहयो मजूरांना थकबाकीची रक्कम मिळणार उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

**पालघर जिल्ह्यातील रोहयो मजूरांच्या थकबाकीचा प्रश्नविधानसभेत अजितदादांच्या उत्तराने चुटकीसरशी सुटला**

**उपमुख्यमंत्री अजितदादांच्या संवेदनशील निर्णयामुळे रोहयो मजूरांची होळी आनंददायी होण्याचा मार्ग**

खुलापालघरमधील चार हजार रोहयो मजूरांना थकबाकीची रक्कमहोळीपूर्वी तात्काळ वितरीत करण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. ११ :-** पालघर जिल्ह्याच्या वाडा, जव्हार, विक्रमगड तालुक्यातील रोजगार हमी योजनेवरील चार हजार मजूर थकीत मजूरीची रक्कम मिळावी म्हणून तहसिल कार्यालयासमोर सकाळपासून थांबून असल्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित होताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अत्यंत संवेदनशीलतेने दखल घेऊन संबंधीत मजूरांना त्यांची 45 कोटींची थकबाकी होळी सणापूर्वी तात्काळ वितरीत करण्यात येईल, अशी घोषणा केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या घोषणेने हातावर पोट असलेल्या रोजगार हमी मजूरांची होळी आनंदात साजरी होण्याचा मार्ग खुला झाला आहे. वसई-विरार मतदारसंघाच्या आमदार स्नेहा दुबे यांनी पालघर जिल्ह्याच्या वाडा, जव्हार, विक्रमगड तालुक्यातील रोजगार हमी योजनेवरील चार हजार मजूरांना त्यांची मजूरी मिळाली नसल्याचे आणि त्यासाठी ते संबंधित तहसिल कार्यालयांसमोर सकाळपासून जमले असल्याची माहिती सभागृहाला दिली. या मजूरांना थकीत मजूरीची रक्कम तात्काळ मिळावी, ही मागणी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनद्वारे त्यांनी केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हा मुद्दा अत्यंत संवेदनशीलतेने घेऊन संबंधीत मजूरांसाठी 45 कोटी रुपये तात्काळ वितरीत करण्याचे निर्देश दिले. रोजगार हमी विभागाला 220 कोटी रुपये नुकतेच वितरीत करण्यात आले असून त्यातून ही रक्कम तात्काळ दिली जाईल. त्यामुळे संबंधित मजूरांना होळी आनंदात साजरी करण्यात अडचण येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या या संवेदनशीलतेने रोजगार हमी योजनेच्या चार हजार मजूरांची होळी आनंददायी होणार आहे.

# कल्याण –बदलापूर तिसऱ्या चौथ्या रेल्वे मार्गिकेचे काम सुरु

**रुळांशेजारील अतिक्रमणे हटवली**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** कल्याण ते बदलापूर दरम्यान तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेचे काम रेल्वे प्रशासनाने हाती घेतले आहे, त्यामुळे रेल्वे रुळांशेजारी असलेली अतिक्रमणे हटवण्यास सुरूवात झाली आहे. आज सोमवारी अंबरनाथ पूर्वेच्या भीमनगर परिसरात रेल्वेच्या हद्दीतील झोपडपट्टीवर मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन प्रशासनाच्या माध्यमातून रेल्वे पोलीस आणि शिवाजीनगर पोलिसांच्या बंदोबस्तात तोडक कारवाई करण्यात आली. यादरम्यान बाधित झालेल्या पात्र झोपडपट्टीधारकांचे एमएमआरडीएच्या माध्यमातून पनवेल आणि शहाड याठिकाणी पुनर्वसन करण्यात आले आहे. तिसऱ्या व चौथ्या मार्गिकेसाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या माध्यमातून झोपडपट्टी हटवण्यासाठी जेसीबीच्या साह्याने तोडक कारवाई सुरू झाली आहे. २४ फेब्रुवारी रोजी रेल्वे प्रशासनाने बाधित झोपडपट्टीधारकांना या कारवाईबाबत नोटीस बजावली होती. सोमवारपासून भीमनगर येथील झोपडपट्टी हटवण्यास रेल्वे प्रशासनाने सुरुवात केली.



## गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परन्तप । सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ४-३३ ॥

हे परंतपा (अर्थात शत्रुतापना) पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ अत्यंत श्रेष्ठ आहे. तसेच यच्चयावत् सर्व कर्मे ज्ञानात समाप्त होतात. ॥ ४-३३ ॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ४-३४ ॥

ते ज्ञान तू तत्त्वसाक्षात्कारी ज्ञानी लोकांच्याकडे जाऊन समजून घे. त्यांना साष्टांग नमस्कार केल्याने, त्यांची सेवा केल्याने आणि निष्कपटपणे सरळ मनाने त्यांना प्रश्न विचारल्याने, परमात्मतत्त्व उत्तम रीतीने जाणणारे ते ज्ञानी महात्मे तुला त्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करतील. ॥ ४-३४ ॥

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव । येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ४-३५ ॥

जे जाणल्याने पुन्हा तू अशा प्रकारच्या मोहात पडणार नाहीस, तसेच हे पांडवा (अर्थात पांडुपुत्र अर्जुना), ज्या ज्ञानामुळे तू सर्व सजीवांना पूर्णपणे प्रथम आपल्यात आणि नंतर मज सच्चिदानंदघन परमात्म्यात पाहशील. ॥ ४-३५ ॥

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः । सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि ॥ ४-३६ ॥

जरी तू इतर सर्व पाप्यांहूनही अधिक पाप करणारा असलास, तरीही तू ज्ञानरूप नौकेने खात्रीने संपूर्ण पापसमुद्रातून चांगल्याप्रकारे तरून जाशील. ॥ ४-३६ ॥

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन । ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ४-३७ ॥

कारण हे अर्जुना, ज्याप्रमाणे पेटलेला अग्नी इंधनाची राख करतो, तसाच ज्ञानरूप अग्नी सर्व कर्मांची राखरांगोळी करतो. ॥ ४-३७ ॥

## रेसिपी

### तांदळाचा पापड



साहित्य-


एक कप - तांदळाचे पीठ
दोन - कप पाणी
अर्धा टीस्पून ओवा
चवीनुसार मीठ
एक टीस्पून - तेल

कृती-

सर्वात आधी पाण्यात मीठ आणि तेल गाळावे आणि त्याला उकळी आणावी. त्यानंतर त्यात हळूहळू तांदळाचे पीठ आणि ओवा घाला आणि सतत ढवळत राहा. आता मिश्रण घट्ट झाल्यावर गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या. छोटे गोळे बनवा आणि त्यांचे पापड लाटून उन्हात वाळवा. पापड वाळल्यानंतर तेल गरम करून पापड तळून घ्या. तसेच त्यांना हवाबंद डब्यात देखील ठेऊन शकता. तर चला तयार आहे आपले तांदळाचे पापड रेसिपी.

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त



महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्रीपदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत ह मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. यशवंतराव चव्हाण यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# लेफ्टनंट शामली जाधवची यशोगाथा

शामलीचा खरा अर्थ आहे पिवळसर हिरवी किंवा भरलेली वेल ! जी उंचंच उंच उत्तुंग शिखरावर जाण्यासाठी सतत बहरत असते झेपावत असते !अशी सांवली वेल ! जीचा उल्लेख आपल्या राष्ट्रिय गीतात सस्यश्यामला असा आला आहे ! आणि ह्या आपल्या मातीतील शामलीच्या नावातही शाम म्हणजे श्रीकृष्ण आहे कि ज्या धुरंधराने महाभारताच्या युद्धाचे नेतृत्व केले आणि सत्याला विजय मिळवून दिला ! लेफ्टनंट शामलीही यापुढे असेच नेतृत्व करणार आहे !

मुरबाडची शानच नव्हे तर मुरबाडचा अभिमान कुमारी शामली भाग्यश्री विजय जाधव ! खरंतर मुरबाडच्या या मातीत जन्माला येणं आणि इतिहास घडवणं हा ह्या मातीचाच गुण आहे हे एकदा लेफ्टनंट शामलीनं सत्यात आणलय !

बापाचं छत्र हरपलं पण बापाचं स्वप्न लेकीनं पुरं करावं हेच तर ध्येय आणि उद्दिष्ट तीच्या नजरेसमोर होतं ! लेफ्टनंट शामलीनं ते साकारलं ! बापाचा आशिर्वाद सदैव लेकीच्या पाठी असतोच जीथं बाप असतो तीथून तो अनिमिष नजरेनं लेकीला उर्जाच देत असतो ! मन शुद्ध तुझं गोष्ट लाख मोलाची तु चाल पुढं तुला भिती कशाची ! हे अंतर्धानात विलीन झाला तरी जिथं असतो तिथून धीर देतच असतो ! त्यात आई, समाज धुरंधर संतोष जाधव यांसारखे काका,नातेवाईक ,हितचिंतक यांच्या प्रेरणेनं स्वतःच्या अविचल ध्येयानं तिनं हे अढळपद बुद्धी चातुर्य आणि श्रमानं मिळवलं .मुरबाड सारख्या ऐतिहासिक - सांस्कृतिक तालुक्याच्या शिरपेचात आज आणखी एक मुकुटमणी रोवला गेला आणि तमाम मुरबाड वासियांनी आपल्या लेकीचा ढोलताशांच्या गजरात सन्मान सोहळा याची देही याची डोळा पाहिला.खऱ्या अर्थाने आज मुरबाडच्या इतिहासाच्या पानावर एक नाव रोवलं



गेलं कुमारी शामली भाग्यश्री विजय जाधव ! ही भारतीय सैन्य दलाच्या लेफ्टनंट पदावर विराजमान झाली आणि खऱ्या अर्थाने केवळ मुरबाडचीच नव्हे तर महाराष्ट्राची ही मान उंचावली !श्यामली नावाची जाधव कुटुंबात जन्माला येणारी युवती आज देशाच्या सैन्यातील तुकडीचे नेतृत्व करणार ही अभिमानाची गोष्ट ! खरंतर लेफ्टनंट या पदावर जाण्यासाठी तिने जो खडतर प्रवास केला त्याला मानाचा मुजरा ! केवळ ती लेफ्टनंट झाली एका मोठ्या पदावर विराजमान झाली इथवर थांबून तीला चालणार नाही तर भविष्यात तिला या पदावरून पुढे जाण्यासाठी दाही दिशा मोकळ्या आहेत ! कारण यानंतर अनेक उत्तुंग शिखरे सर करण्यासाठी तिला खुणावणार आहेत ! म्हणून तीचं अभिनंदन आणि शुभेच्छाही !

ति ज्या पदावर पोहोचले तिचा आदर्श घेऊन अनेक युवक युवती तो प्रयास प्रयत्न करणार आहेत .आजच्या दिमाखदार गौरव मिरवणुकीने अनेकांना तिचा आदर्श घ्यावा हे नक्कीच वाटलं असेल !त्यासाठी तिचा जो प्रवास झाला तो अकादमीच्या अर्थाने थोडासा समजून घेऊया ! सैन्यातील लेफ्टनंट हे एक कमिशन्ड अधिकारी पद आहे जे भारतीय सैन्यात सुरुवातीच्या स्तरावरचे मानाचे पद मानले जाते आणि ते ४० ते ६० जणांच्या युनिटचे नेतृत्व करतात .जे त्यांना थेट रिपोर्ट करतात .प्रमोशन नंतर ती संख्या एका तुकडीची पाचशे ते पंधराशे असते आणि त्यानंतर त्या पदावरील अधिकाऱ्याला अशा चार ते सहा तुकड्यांना मार्गदर्शन करावे लागते किंवा त्यांचे नेतृत्व करावे लागते . आता लेफ्टनंट म्हणजे वरच्या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत पद धारण करणारा अधिकारी वर्गात ज्याचे स्थान आहे !ज्या पदाची पदोन्नती आणि वेतनवाढ होते . लेफ्टनंट म्हणजे हल्ला करणे !त्याच्या एपलेटवर वर एक तारा असतो ! लेफ्टनंटच्या जनरल कमांडमध्ये जमीन, नौदल आणि हवाई दल कमांडर अंतर्गत सेवा येतात .लेफ्टनंटचे सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे सैन्याच्या श्रेणीबद्ध क्रमानुसार तो नेतृत्व करत असलेल्या संघाचे नेतृत्व करणे हे आहे . लेफ्टनंट शामली जाधव यांना लेफ्टनंट या पदावर पोहोचण्यासाठी नॅशनल डिफेन्स युनिव्हर्सिटी MSU मिलिटरी स्टुडन्ट कॅंडिडेट डिटर्मिनेशन परीक्षेत OSYM द्वारे आयोजित केलेल्या परीक्षेत सहभागी होण्यासाठी अशा मिलिटरी अकॅडमीत सहभागी व्हावे लागले .तद्नंतर प्रशिक्षणाद्वारे लेफ्टनंट होण्यासाठी लष्करी शिक्षण, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा कार्यक्रम तसेच मिलिटरी अकॅडमीमध्ये दिलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांतून यशस्वीरित्या पदवीधर होणे आवश्यक होते आणि तो खडतर प्रवास शामली भाग्यश्री विजय जाधव यांनी लिलया पार पाडला म्हणून आज त्या लेफ्टनंट या पदावर विराजमान झाल्या ! त्यांच्या पुढील प्रवासास मनःपूर्वक शुभेच्छा आणि अशीच मानाची पदे ती उत्तरोत्तर घेत राहो ,संपादित करो यासाठी तिला लक्ष लक्ष शुभेच्छा !

**शुभेच्छुक -**
एकनाथ कुसुम महादू देसले
(साहित्यिक/नाट्य -चित्र लेखक दिग्दर्शक)

# भिवंडी येथील बीजीपी दवाखाना स्थलांतरित

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मंडई, भिवंडी येथील बीजीपी दवाखान्याची इमारत मोडकळीस व धोकादायक स्थितीत आल्यामुळे सदर दवाखाना स्व. मिनाताई ठाकरे रंगायतन, बाजार पेठ, भिवंडी येथे तात्पुरत्या स्वरूपी स्थलांतरित करणेत आले होते. मनपास्तरावरून स्व. मिनाताई ठाकरे रंगायतनचे नुतनीकरणाचे काम हाती घेणेत आल्यामुळे सदर ठिकाणी कार्यरत असलेले बीजीपी दवाखाना बंगालपूरा, सोनापूर मस्जिद समोर, भिवंडी येथे तात्पुरत्या स्वरूपी स्थलांतरित करणेत आले होते. महानगरपालिकेच्या मंडई, भिवंडी. येथे अर्थात जुन्या ठिकाणी बीजीपी दवाखान्याकरीता नवीन इमारत उभारण्यात आलेली आहे. त्यामुळे वंगालपूरा, सोनापूर मस्जिद समोर, भिवंडी येथे तात्पुरत्या स्वरूपी स्थलांतरित करणेत आलेले बीजीपी दवाखाना पुन्हा पूर्ववत मंडई, भिवंडी. येथे दि. ११/०३/२०२५ पासून कार्यान्वित (स्थळांतरीत) करणेत आलेले आहे. तरी जास्तीत-जास्त नागरीकांनी सदर दवाखान्यामधील आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा व सदरचा संदेश आपल्या आस-पासच्या नागरीकांना व आपल्या मित्र मंडळी यांना द्यावा. असे आवाहन मा. प्रशासक तथा आयुक्त सो. (भिवंडी मनपा) व वैद्यकिय आरोग्य अधिकारी (भिवंडी मनपा) यांचेकडून नागरीकांना केले आहे.

# कल्याणमध्ये निर्माणाधीन इमारतीच्या पार्किंगचा स्लॅब कोसळल्याने ५ मजूर जखमी

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणतील खडकपाडा परिसरात नामांकित विकासाचे निर्मानाधीन इमारतीच्या पहिल्या माळयावरील पार्किंगचा स्लॅब कोसळल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. याघटनेत चार ते पाच मजूर जखमी झाले. उपाचारार्थ त्यांना रूग्णालयात नेले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

याच वेळी त्या परिसरातून जात असलेले मनसे वार्ड उपाध्यक्ष श्रुतिक पाटील यांनी प्रसिध्दी



## मजूरांचा सुरक्षा प्रश्न ऐरणीवर

माध्यमांना सांगितले की, पार्किंगचा निर्माणाधीन ओला स्लॅांब् कोसळल्याचा आवाज झाल्याने तिथे ढिगारा खाली अडकलेल्या 4ते 5मजूरांना मी आणि तिथे काम करणार्या मजूरांनी बाहेर काढले. त्यापैकी काही जणांच्या हाता पायाला लागले होते. त्यांना तेथील गाडीतून रूग्णालयात नेण्यात आले. या घटनेने निर्मानाधीन इमारतीच्या कामावर असणाऱ्या मजूरांचा सुरक्षा प्रश्न यानिमित्ताने ऐरणीवर आला असल्याचे चित्र दिसत आहे.

# भिवंडी मनपाकडून महिलांसह मुलांच्या संरक्षणाबाबत धडे



• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडून जागतिक महिला दिननिमित्त दिनांक १० मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सांयकाळी ४.०० वाजेपर्यत स्व. राजय्या गाजेंगी सांस्कृतिक हॉल, कोबंडपाडा, भिवंडी येथे महिलांसाठी विविध कार्यक्रम व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा. देविदास पवार मा. आतिरिक्त आयुक्त यांनी केले. कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी मा. श्री. विठ्ठल डाके, अतिररिक्त आयुक्त, मा. रोहिदास दोरकुळकर, उपआयुक्त (मुख्यालय), मा. बाळकृष्ण क्षिरसागर, उपआयुक्त (कर), मा. श्रीम. अनुराधा बाबर, उपआयुक्त (शिक्षण), मा. श्री. शैलेष दोंदे, उपआयुक्त (आरोग्य), व महानगरपालिकेचे सर्व विभाग प्रमुख, प्रभाग अधिकारी १ ते ५ व इतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या महिला कर्मचारी, भिवंडी शहरातील बचत गटातील महिला, बाल विकास सेवा प्रकल्पातील अंगणवाडी सेविका / मदतनिस व आशा वर्कर अशा अंदाजे ७००-७५० महिलांनी सहभाग नोंदवला. या उपस्थित महिलांकरीता भिवंडी महानगरपालिकेकडुन महिला व लहान मुलांच्या संरक्षणसाठी POCSO Act Consent या विषयी साहसी संस्थेकडुन ॲड. अंकित कडू व ॲड. अमोल कांबळे यांनी मार्गदशन केले. तसेच वित्तीय साक्षरता महिला सबलीकरण व सक्षमीकरण याविषयी श्री. किशोर पाटील, अध्यक्ष, नवजिवन लोक विकास संस्था यांचे मार्गदर्शन लाभले. याचबरोबर गौराई मंडळ, डोंबिवली यांनी मंगळागौर कार्यक्रमाचे सादरीकरण केले. तसेच श्रीम. कल्याणी चन्ने, सहा. आस्थापना विभाग प्रमुख्या यांचे मार्गदर्शनाखाली भिवंडी महानगरपालिकेच्या महिला कर्मचारी यांचेकडुन स्वागतगीत, गणेश वंदना, चारोळी, कविता वाचन, समुह नृत्य संगित इत्यांदी कार्यक्रमांचे सादरीकरण केले यामध्ये सहभागी महिलांचा साडी भेट देवून सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित महिलांमधुन लकी ड्रॉ माध्यमातुन ३ पैठणी साडींचे वाटप करण्यात आले. या संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीम. दिप्ती बयास, अभिलेख विभा प्रमुख यांनी केले. सदर कार्यक्रम हा मा. श्रीम. प्रणाली घोंगे, उपआयुक्त सो (समाज कल्याण) यांचे नियंणत्र खाली पार पडला. तसेच या कार्यक्रमाकरीता, मा. श्री मिलिंद पळसुले, सहा. आयुक्त (समाज कल्याण), श्री. नितेश चौधरी, समाज कल्याण विभाग प्रमुख, श्री. स्नेहल पुण्यार्थी, वाचनालय विभाग प्रमुख, श्री. समीर जवरे, स्थानिक संस्था कर विभाग प्रमुख व समाज कल्याण विभाग व एनयुएलएम विभागातील कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# कोळसेवाडी पोलिसांकडून चोरीच्या गुन्ह्याचा तपास



• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कोळसेवाडी पोलीसांनी मोटार सायकल चोरीचे चार गुन्हे उघडकीस आणले असून मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. कोळसेवाडी पोलीस स्टेशन मध्ये मोटार सायकल चोरीचा गुन्हा दाखल झाल्याने वरीष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे व पोनि साबाजी नाईक यांनी कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकास गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या.

रविवारी गुन्हे शोध पथकाचे अधिकारी व अंमलदार मिलींदनगर, कल्याण पुर्व येथे गस्त घालत असताना दोन अल्पवयीन मुले हे संशयीत रित्या त्यांच्या ताब्यात वेगवेगळया दोन लाल रंगाच्या स्कुटी घेवून फिरत असताना दिसून आले. याबाबत त्यांच्या कडे तपास केला असता त्यांच्याकडे मिळुन आलेल्या दोन्ही मोटार सायकल हया चोरीच्या असल्याचे निष्पन्न झाले. त्यांना विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता त्यांनी यापुर्वी देखील दोन मोटार सायकली चोरी केल्याचे सांगुन त्या देखील काढुन दिल्याने त्यांच्या कडुन चार गुन्हयातील चोरी गेलेल्या १ लाख १२ हजार रुपये किमतीच्या चार मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. हि कामगिरी पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे व सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे, पो.नि प्रशासन साबाजी नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सपोनि दर्शन पाटील, संदिप भालेराव व त्यांच्या पथकातील पोहवा राजेश कापडी, मिंलीद बोरसे, विलास जरग, शांताराम सांगळे, भगवान सांगळे, नरेश दळवी, पोशि दिलीप सोनावळे, प्रदीप गिते यांनी केली आहे.

# टिटवाळ्यात शालेय मुलीचा विनयभंग

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : महागणपतीच्या पावन भूमीत कल्याण तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील टिटवाळ्यात क्लेशदायक घटना घडली आहे. माथेफिरूने रविवारी सायंकाळच्या सुमारास एका घरात घुसून दोन शाळकरी अल्पवयीन मुलांचा विनयभंग केला. घडलेला प्रकार कुणाला सांगितला तर तुम्हा दोघींना शाळेमधून उचलून नेईन, अशीही त्या बदमाशाने धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर पालकांनी धाडस करून मुलींसह कल्याण तालुका पोलिस ठाण्यात धाव घेऊन माथेफिरु विरोधात फिर्याद दाखल केली आहे. मात्र हा प्रकार उघडकीस आल्यानंतर परिसरात मात्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी कल्याण तालुका पोलिसांनी सोमवारी मध्यरात्री गुन्हा नोंदवून फरार बदमाशाचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणी विनयभंग करणारा बदमाश हा कल्याण तालुक्यातील घोटसई गावातील असल्याचे पीडितेने तक्रारीत म्हटले आहे. एक पीडित मुलगी १४ वर्षांची असून दुसरी १२ वर्षांची आहे. पीडितेचे कुटुंब मोलमजुरी करून उपजीविका करते. या संदर्भात १४ वर्षीय पिडीत मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून कल्याण तालुका पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, पिडीत मुलगी राहत असलेल्या घराच्या परिसरात एक चायनिजचे दुकान आहे. या दुकानात मालकाच्या भावाचे वारंवार येणे-जाणे असते. त्यामुळे तक्रारदार मुलीची त्याच्याशी तोंड ओळख होती. गेल्या तीन दिवसांपासून शाळेत जात असताना चायनिज दुकानाच्या मालकाचा भाऊ पाठलाग करत असल्याचे मुलीला जाणवत होते. रविवारी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास चायनिज दुकान मालकाचा भाऊ पिडीत मुलीच्या घरात घुसला. तू घरात का आलास ? असा मुलीने जाब विचारला. तू मला खूप आवडतेस, असे बोलून त्याने मुलीचा हात पकडला असता मुलीने त्याचा हात झटकला. त्याला घरातून निघून जाण्यास सांगितले. हा प्रकार सुरू असतानाच पिडीत मुलीची १२ वर्षीय मावस बहिण अचानक घरात आली. घरात काय सुरू आहे, असा जाब विचारला असता त्याने मावस बहिणीच्या खांद्यावर हात टाकून तू सुध्दा मला खूप आवडतेस, असे बोलून हात पकडून स्वयंपाकघरापर्यंत ओढत नेले. घरात घडलेला प्रकार कुणाला सांगितला तर तुम्हाला तुमच्या शाळेमधून उचलून घेऊन जाईन, अशी या दोघींना धमकी दिली. त्यानंतर तो घरातील सोफ्यावर जबरदस्तीने झोपला. तेथे त्याने त्याचे दोन्ही मोबाईल फोडून ते उचलून घेऊन निघून गेला.

या घडल्या प्रकाराने पिडीत दोन्ही बहिणी प्रचंड भयभीत झाल्या होत्या. पिडीतेची आई रात्री मजुरी करून घरी आली. मुलींनी घरात घडलेला सारा प्रकार आईला सांगितला. त्यानंतर आईने दोन्ही मुलींसह कल्याण तालुका पोलिस ठाणे गाठले. पोलिसांनी दोन्ही मुलींना धीर दिला. त्यानंतर मोठ्या मुलीच्या फिर्यादीवरून तातडीने गुन्हा दाखल करून घेतला. आरोपी अद्याप हाती लागला नसून पोलिस उपनिरीक्षक प्रशांत जाधव आणि त्यांचे सहकारी त्याचा कसोशीने शोध घेत आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# ईपीएफ - पेन्शनधारकांना साडेसात हजार पेन्शन द्यावी

## खासदार नरेश म्हस्के यांची संसदेत आग्रही मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली** - महागाई वाढत असताना ईपीएस- ९५ (कर्मचारी निवृत्त योजना ९५) पेन्शनधारक मात्र दरमहा किमान एक हजार रुपये पेन्शनवर जगत आहेत. ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत शून्य प्रहर कालवधीत पेन्शनधारकांच्या प्रश्नांवर आवाज उठवत किमान पेन्शन ७,५०० रुपये करावी, अशी आग्रही मागणी केली.केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालय अंतर्गत ईपीएस-९५ पेन्शन योजनेच्या पेन्शनधारकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे खासदार नरेश म्हस्के यांनी आज सभागृहाचे लक्ष वेधले. देशभरात केंद्र आणि राज्य सरकारचे उपक्रम, खासगी संस्था आणि कारखान्यांशी संलग्न असलेले ७८ लाख पेन्शनधारक दरमहा किमान एक हजार रुपये पेन्शनवर जगत आहेत. सध्याच्या परिस्थितीत ही रक्कम अपुरी असून मूलभूत गरजा आणि आरोग्य सेवांपासून ते वंचित




आहेत. २०१३ मध्ये कोश्यारी समिती, २०१८ मध्ये कामगार संसदीय समिती आणि ईपीएफओच्या उच्चस्तरीय समितीनेही किमान पेन्शन दरमहा ७,५०० रुपये तर कमाल १०,०५० असावी अशी शिफारस केली होती मात्र त्याची अद्याप ठोस अंमबजावणी झाली नसल्याची बाब खासदार नरेश म्हस्के यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.गेल्या ७-८ वर्षांपासून पेन्शनधारक या मागणीसाठी आंदोलन करत आहेत. दुर्दैवाने त्यांचा आवाज आजतागायत ऐकला गेला नाही. ईपीएस-९५ पेन्शन योजनेत त्वरित सुधारणा करावी आणि किमान पेन्शन दरमहा ७,५०० रुपये करावी, अशी मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी केली. तसेच पेन्शनधारक आणि त्यांच्या कुटुंबियांना महागाई भत्ता आणि मोफत आरोग्य सेवा देण्यात याव्यात, ज्यामुळे पेन्शनधारकांचे जीवनमान तर सुधारेल, शिवाय त्यांच्या दशकांच्या योगदानाचाही सन्मान होईल. ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य क्रम देऊन त्यांना न्याय देण्याची जबाबदारी या सभागृहाची आणि सरकारची असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी स्पष्ट केले. ठाणे लोकसभा म त द र स ंघ ात ील पेन्शनधारकांनी आणि संघटनांनी खासदार खासदार नरेश म्हस्के यांनी नुकतीच भेट घेत पेन्शनधारकांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याची विनंती केली होती. खासदार खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत पेन्शनधारकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याची ग्वाही दिली होती.

# आरटीई प्रवेशासाठी खोटी माहिती देणाऱ्या पालकांवर गुन्हे दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**खास प्रतिनिधी**

आरटीई प्रवेशासाठी खोटा रहिवासी पुरावा सादर करून शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी पुण्यातील 18 पालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून, बावधन पोलिसांकडे याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे खोटी कागदपत्र सादर करून प्रवेश मिळवणाऱ्या पालकांना मोठा धडा मिळाला आहे.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत आरटीई ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया




राबवली जात आहे. परंतु, अनेक पालक खोटी कागदपत्र सादर करून आपल्या पाल्याला आरटीई अंतर्गत प्रवेश मिळून देण्यासाठी प्रयत्नशील असतात. शिक्षण विभागाने वेळोवेळी परिपत्रक प्रसिद्ध करून बनावट कागदपत्र सादर करणाऱ्या पालकांविरोधात कारवाई करण्याचा इशारा दिला होता. त्याचप्रमाणे खोटा रहिवासी पुरावा सादर करून आरटीई अंतर्गत प्रवेश मिळवल्यास संबंधित पालकांविरोधात कारवाई केली जाईल, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले होते. पालकांनी सादर केलेल्या रहिवासी प्रमाणपत्राच्या आधारे शिक्षण विभागातील अधिकारी संबंधित पत्त्यावर जाऊन चौकशी करू शकतात, असेही स्पष्ट करण्यात आले होते. तरीही अनेक पालकांनी खोटी कागदपत्र सादर करून आरटीई अंतर्गत प्रवेश मिळवल्याचे समोर आले आहे. त्यामुळे तपास करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जानेवारी 2024 ते ऑक्टोबर 2024 पर्यंत माताळवाडी भुगाव या ठिकाणी संबंधित पालकांनी खोटी कागदपत्र सादर करून शासनाची दिशाभूल केली असल्याचे आढळून आले आहे. सचिन चंद्रकांत भोसले, खंडू दिलीप बिरादार, रामकृष्ण तानाजी चोंधे, सुमित सुरेश इंगवले, विजय सुभाष जोजारे, मंगेश गुलाब काळभोर, रोहिदास मारुती कोंढाळकर, श्रीधर बाबुराव नागुरे, बाबासाहेब छबुराव रंधे, विलास रामदास साळुंखे, गणेश राजाराम सांगळे, रुपेश बाळकृष्ण सावंत, दिगंबर पंडित सावंत, चंदन अंकुश शेलार, कुंभराम सांगीलाल सुतार, मंगेश झबुलाल गुरव, विवेक जयवंत जोरी, उमेश हिरामण शेवडे या 18 पालकांनी खोटी कागदपत्र सादर करून प्रवेश मिळवले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणी शिक्षण विभागाकडून चौकशी समिती स्थापना करण्यात आली होती. समितीने दिलेल्या अहवालानंतर खोटी कागदपत्र सादर करून प्रवेश मिळाल्याचे समोर आले. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

# ‘ती’ १४ गावे नवी मुंबईत नकोतच !

## गणेश नाईकांचा ठाम निर्धार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण मतदारसंघातील शीळ-तळोजा मार्गालगतची १४ गावे नवी मुंबई महापालिका हद्दीत समाविष्ट करण्याच्या निर्णयाला वनमंत्री गणेश नाईक यांनी विरोध केला आहे. त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत पत्र पाठविले असून यामुळे ठाणे जिल्ह्यातील नाईक विरुद्ध शिंदे संघर्ष पुन्हा प्रकर्षाने समोर आला आहे.

१४ गावांच्या समावेशामुळे नवी मुंबई महापालिकेवर सहा हजार कोटी रुपयांच्या आर्थिक भार पडणार असल्याचे नाईक यांचे म्हणणे आहे. एकेकाळी वाढीव मालमत्ता कराच्या प्रश्नावर नवी मुंबई महापालिकेतून बाहेर पडल्याने ही गावे समस्यांच्या गर्तेतत सापडली आहेत. यातून बोध घेऊन ग्रामस्थांनी आमच्या गावांचा पुन्हा नवी मुंबई महापालिकेत समावेश करावा अशी मागणी लावून धरली होती. लोकसभा निवडणुकांची



आचारसंहिता लागू होण्यापुर्वी तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासन निर्णय काढून ही मागणी पुर्ण केली.

डॉ. श्रीकांत यांच्या आग्राहामुळेच हा निर्णय घेतला गेल्याची चर्चा तेव्हा रंगली होती. या पार्श्वभूमीवर ठाणे-कल्याण वेशीवरील १४ गावे नवी मुंबई महापालिका हद्दीतून वगळावित असे पत्र नाईक यांनी मुख्यमंत्र्यांना दिल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या गावांच्या विकासाचा भार नवी मुंबईकर करदात्यांनी का सोसावा, असा सवाल पत्रात करण्यात आला आहे.

# खार्डी पुलाचे बांधकाम सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली, ता. ११ : दिवा व शिळफाटा परिसराला जोडणारा एकमेव मार्ग म्हणजे खर्डीपूल आहे. या पुलाची दुरवस्था झाल्याने या ठिकाणी नवीन पूल बांधण्यात येणार आहे. माजी आमदार राजू पाटील यांनी या कामाचा पाठपुरावा केला होता. लोकसभा व विधानसभा निवडणुकीमुळे या पूल उभारणीच्या कामाला विलंब झाला होता; मात्र आता या कामास सुरुवात झाली आहे. त्यामुळे नागरिकांना लवकरच सुसज्ज असा मार्ग उपलब्ध होणार आहे. शिळफाटा व दिवा या भागांना जोडणारा मार्ग हा खर्डी खाडीतून जातो. शिळ खर्डी गाव दिवाला जोडण्यासाठी पीडब्ल्यूडी अंतर्गत खर्डी खाडीवर पुलाची उभारणी करण्यात आली. २००४ साली खर्डीपूल तयार झाला आणि दिवा-शिळ खर्डी परिसर एकमेकांना जोडला गेला. या पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होते, मात्र सध्या पुलाची देखभाल दुरुस्ती न झाल्याने तो जुना होऊन नादुरुस्त झाला आहे. हा पूल अरुंददेखील असल्याने या ठिकाणी नवीन पुलाची उभारणी करावी, अशी मागणी कल्याण ग्रामीणचे तत्कालीन आमदार राजू पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली होती. दिवा रेल्वे स्थानक ते शिळफाटा रस्त्यावर खर्डी खाडीवर नवीन पुलाचे बांधकाम करण्यासाठी सहा कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. यासाठी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे निधीची मागणी करण्यात आली होती. या कामाला मंजुरी मिळाली असून, निधीदेखील मंजूर केला; मात्र लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या पुलाच्या कामास विलंब झाला होता. अखेर या कामास सुरुवात झाल्याने लवकरच हे काम पूर्ण होऊन नागरिकांना दिलासा मिळेल.

> शिळ-दिवा मार्गावर खाडीपुलाजवळ नवीन पूल बांधण्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी केली होती. यासाठी सहा कोटींची निधीचीदेखील मंजुरी देण्यात आली. आम्ही केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. कल्याण ग्रामीण मतदारसंघातील शिळ-दिवा पूल अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या अस्तित्वात असलेले पूल अत्यंत अरुंद आहेत. या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात रहदारी सुरू असते. दरम्यान, येथे नवीन पूल झाल्यास कोंडीची समस्या कमी होणार आहे.
>
> - राजू पाटील, माजी आमदार, कल्याण ग्रामीण

# उल्हास प्रभात तर्फे राज्यस्तरीय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हास प्रभात तर्फे यावर्षीही राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक, शिक्षण, कला, क्रीडा, आरोग्य, उद्योग, साहित्य, अध्यात्मिक, राजकीय, निसर्ग, शेती, पशुपक्षी प्राणी, सेवाभावी, पत्रकारिता, शासकीय अधिकारी कर्मचारी आदी क्षेत्रातून कार्य करणाऱ्या व्यक्तींनी पुरस्कारासाठी आपले प्रस्ताव तातडीने संबंधित कागदपत्रांसह संपूर्ण नाव, पत्ता, फोटो व फोन नंबर लिहून तातडीने पुढील पत्त्यावर पाठवावे असे आवाहन उल्हास प्रभातचे संपादक संपादक डॉ. श्री. गुरुनाथ पांडुरंग बनोटे (मो. 9270175413) यांनी केले आहे.पोस्टाने किंवा कुरिअरने पाठविण्याचा पत्ता: सौरभ बनोटे 603 सचिनम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, गावदेवी, बदलापूर पूर्व, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे, पिनकोड नंबर 421 503

# २६ - ११ चा हल्ला जवळून पाहिलेल्या परिचारिकेचा सत्कार !

## नगरसेविका वृषाली रणजित जोशी यांची विशेष कामगिरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचे सत्कार सगळीकडे केले जातात. मात्र माजी नगरसेविका वृषाली जोशी आणि नगरसेवक रणजित जोशी हे दाम्पत्य प्रत्येक वर्षी एक लक्षवेधी महिलेचा विशेष सत्कार करीत असतात. या वर्षीही त्यांनी तो २६ - ११ चा हल्ला जवळून पाहिलेल्या मुंबईतील कामा हॉस्पिटलमध्ये कार्यरत परिचारिका वृषाली जळवी यांचा विशेष सत्कार केला तेव्हा उपस्थित महिलांनी आदराने नतमस्तक होऊन त्यांना आलिंगन दिले. दरम्यान काही वेळ वातावरण शांतमय झाला. पण ६५ वर्षीय वृषाली जळवी यांचा सत्कार सर्वांना भरवून गेला.



पश्चिमेकडील देवी चौक येथील माजी नगरसेवक रणजित जोशी यांच्या जनसंपर्क कार्यालयात 'सन्मान नारी शक्तीचा' कार्यक्रमात अंगणवाडी सेविका, घरकाम महिला, भाजी विक्रेत्या महिला, वाहतूक महिला पोलीस, शहर महिला पोलीस, महिला पत्रकार, परिचारिका यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विशेष सत्कारमूर्ति निवृत्त परिचारीका वृषाली जळवी यांनी २६-११ च्या हल्ल्यातील अनुभव सांगितला. त्या म्हणाल्या, २६-११ चा हल्ला झाला होता तेव्हा मी आणि काही नर्स कामा हॉस्पिटल मध्ये होतो. आतंकवादयानी हॉस्पिटलमधे घुसून चार जणाना गोळ्या झाडून ठार केले.

गोळीबाराचा आवाज ऐकून आम्ही घाबरलो. हॉस्पिटलमध्ये जिथे उजेड दिसत होता त्या दिशेने ते गोळीबार करत होते. आम्ही खुप घाबरलो होत कारण हॉस्पिटलच्या सुरक्षा रक्षकाला मारले तर आमचे रक्षण कोण करणार? आतंकवाद्यानी सुरक्षारक्षकांना गोळ्या झाडून ठार मारले होते.

पहाटे पहिले तर हॉस्पिटलमध्ये अनेक मृतदेह पडलेले दिसले.दरम्यान महिला पोलिसांचा सत्कार केल्यानंतर त्यांनी वृषाली जोशी यांचे आभार मानले. घरकाम महिलांचा सत्कार करताना आपल्या खूप आनंद होत असल्याचे सांगितले. माजी नगरसेविका वृषाली जोशी म्हणाल्या, शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक रणजित जोशी यांच्या पुढाकाराने जगातील महिला दिनानिमित्त समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी परिसरातील अनेक महिलांनी उपस्थिती दर्शविली होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. पूजा जोशी, शाखाप्रमुख वैशाली पेणकर, उपशाखाप्रमुख ज्योती औटी, अश्विनी आनंद, जान्हवी बापर्डेकर, मजदूर कामगार संघटनेच्या अधिष्ठाता वर्षा लोखंडे यांचं विशेष योगदान लाभलं. कार्यक्रमच सूत्रसंचालन दिनश्री गुजर यांनी केले.

# कल्याण पूर्वेतील कचरा प्रकल्पाविरोधात स्थानिक आक्रमक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील १०० फुट रोड, शिवरल चौक येथे कल्याण डोंबिवली महानगरपालिका मलनिसारण आरक्षण क्र ३३० येथे होत असलेल्या कचरा एकत्रीकरण, प्रेसिंग कचरा वाहतूक व कचरा गाडयांचे वाहन स्थळ प्रकल्पास स्थानिक रहिवाश्यांचा विरोध असून या प्रकल्पा विरोधात रहिवासी आक्रमक झाले आहेत. हा प्रकल्प मानवी वस्ती पासून दूर स्थलांतर कराण्याची मागणी या नागरिकांनी केली आहे. या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी 100 फुट रोड, नागरिक संघर्ष समितीने रस्त्यावर उतरून या



प्रकल्पा विरोधात निदर्शने केली असल्याची माहिती भाजपा महिला मोर्चा शहर उपाध्यक्ष विमल कटके यांनी दिली.

कल्याण (पुर्व) येथील १०० फुट रोड हा कल्याण पूर्व ला एकमेव वैभव प्राप्त झालेला रस्ता आहे ज्या रस्त्यावर रोज हजोरो नागरीक सकाळी व संध्याकाळी मोकळी व स्वच्छ हवा घेण्यासाठी तसेच फिरण्यासाठी येतात. १०० फुट रोडचे वैभव पाहुन हजारो नागरीकांनी स्वकष्टाने व कर्ज घेऊन स्वप्नातील घर विकत घेतले आहे. पुढील कित्येक वर्षे ते कर्जाचे हप्ते फेडत राहणार आहेत. या १०० फुट रस्त्याला लागुन महानगर पालिकीचे मलनिसरणाचे आरक्षण क्र ३३० असुन या आरक्षणात महानगर पालिका कचरा एकत्रीकरण, प्रेसिंग कचरा वाहतूक व कचरा गाडयांचे वाहन स्थळ प्रकल्प आणण्याच्या नियोजनात आहेत त्या बाबत स्थानिक १०० फुट रत्यावरील गुह प्रकल्पातील नागरीकांना, शाळा, महाविद्यालय यांना कुठल्याही प्रकारे विचारात न घेता हा प्रकल्प राबविण्याचे काम चालू केले आहे.

या आरक्षणात पुर्वीपासुन मलनिसरणाचा प्रकल्प चालू आहे. ज्यामुळे परिसरात दुर्गधी व डासांचे प्रमाण मोठयाप्रमाणात आहे. एक मलनिसरणाचा प्रकल्प चालू असताना दुसरा कचरा एकत्रीकरण, प्रेसिंग कचरा वाहतूक व कचरा गाडयांचे वाहन स्थळ प्रकल्पा मुळे मोठ्या प्रमाणात दुर्गधी व रोगराई पसरण्याची शक्यता आहे. तसेच प्रकल्पामुळे परीसरातील हवेची गुणवत्त पूर्ण पणे दुशित होईल त्यामुळे परिसरातील स्थानिक नागर, वयोवृध्द नागरीक, महिला, लहान मुलांच्या आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होतील अनेक दुर्जर श्वसनाचे, त्वचेचे आजार होऊ शकतात.

# वसई-विरारमध्ये फेरीवाल्यांची संख्या वाढली

## महापालिकेचे दुर्लक्ष



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विरार, ता. ११ (बातमीदार)** : राष्ट्रीय फेरीवाला धोरणाअभावी फेरीवाल्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊन सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे वसई-विरार महापालिका क्षेत्रात लवकरात लवकर 'फेरीवाला धोरण' लागू करून फेरीवाल्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणावे, अशी मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर पाटील यांनी केली आहे. पालिका अतिरिक्त संजय हेरवाडे यांची सोमवारी (ता. १०) भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

शहरामध्ये राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करावे, असे राज्य सरकारचे २०१४ मध्ये आदेश आहेत. त्यानुसार वसई-विरार महापालिकेने फेरीवाल्यांचे बायोमेट्रिक पद्धतीने सर्वेक्षण पूर्ण केले होते. यामध्ये १२ हजार ७६८ स्थिर फेरीवाले आणि दोन हजार ३८८ अस्थिर फेरीवाल्यांची बायोमेट्रिक पद्धतीने नोंद करण्यात आलेली आहे; मात्र पालिकेतर्फे फेरीवाला धोरणाबाबत कोणताही निर्णय न झाल्याने अजूनही ते बारगळलेले आहे. धोरण निश्चित करण्याचे काम सुरू असल्याचे पालिकेकडून नेहमी सांगण्यात येते; मात्र अजूनही पालिकेला त्यात यश आलेले नसल्याने किशोर पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

### ९० लाखांचा खर्च अपेक्षित

शहराचे नियोजन व विकास आराखडा नगररचना विभागामार्फत होत असल्याने सर्वेक्षण झालेल्या फेरीवाल्यांसाठी झोन निर्माण करण्याबाबतचे काम नगररचना विभागाकडून होणे आवश्यक आहे, अशा शब्दांत दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागाने फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीआडची अडचण सांगितलेली आहे. २०१७ नंतरच्या अद्ययावत फेरीवाल्यांचे बायोमेट्रिक पद्धतीने पुन्हा सर्वेक्षण करणे, नोंदणी करणे, ओळखपत्र देणे व विक्री प्रमाणपत्र देण्याबाबतच्या कार्यवाहीसाठी व त्या आनुषंगिक खर्चास डे-एनयूएलएम विभागाने प्रशासकीय व वित्तीय मान्यता मागितलेली आहे. या सर्वेक्षणाकरिता नगर परिषद प्रशासन संचालनालय यांची मान्यता मिळालेली आहे; मात्र यासाठीच्या निधीची व्यवस्था महापालिकेला करायची आहे. प्रत्येक प्रभाग समितीनिहाय अंदाजित खर्च १० लाख म्हणजेच नऊ प्रभाग समितींसाठी ९० लाख रुपये खर्च येणार असल्याचे या विभागाने म्हटले आहे.

# नवीमुंबई पालिका मुख्यालयाजवळच वृक्षतोड

## २०० हून अधिक झाडांची कत्तल, पर्यावरणप्रेमींचा संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिका मुख्यालयाच्या समोरील आणि एनआरआय पोलीस ठाण्याच्या शेजारील परिसरात जवळजवळ २०० पेक्षा अधिक झाडे तोडली आहेत. याविरोधात पर्यावरणप्रेमींनी आक्रमक पवित्रा घेतला असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. पालिकेने झाडे तोडण्यासासाठी व तेथील जागेचे सपाटीकरण करण्यासाठी वापरण्यात आलेले ३ जेसीबी जप्त केले असून त्यावर प्रत्येकी ३० हजार रुपयाचा दंड ठोठावला आहे. परंतु अद्यापही झाडे तोडली कोणी याचा उलगडा झालेला नाही.

नवी मुंबई शहरात होऊ घातलेल्या विमानतळामुळे जागांचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यातच पामबीच मार्गालगतर जागांचे भाव कोटींची उड्डाणे घेत असल्याने या ठिकाणी सिडकोच्या मदतीने भूखंड मिळवण्यासाठीची



मोठी स्पर्धा पाहायला मिळते. तर दुसरीकडे ज्या ठिकाणी झाडे तोडण्याचा प्रकार झाला आहे, तो कांदळवनाचा बफर झोन असल्याचा दावा पर्यावरणप्रेमींनी केला आहे. पालिका व पोलीस यांच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात झाडे तोडली जात असताना सरकारी सरकारी आस्थापना काय करत होत्या असा प्रश्न पर्यावरणप्रेमींनी विचारला आहे.

मुळातच हा परिसर हा पक्षी व कोल्हा प्राण्यांसाठीचा रहिवास असलेला परिसर असून हा परिसर बफर झोन असताना येथे वृक्षतोड करण्यात आली आहे. याबाबत वनसंरक्षक अधिकाऱ्यांनी योग्य ती कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

> बेलापूर सेक्टर ५२ अ परिसरातील भूखंड क्रमांक ३ ,६,७ परिसरातील झाडे जेसीबीच्या सहाय्याने तोडण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने पालिकेने तात्काळ जागेवरील २ जेसीबी सील केले आणि प्रत्येकी ३० हजार रुपयांचा दंड लावला. सिडकोकडून कोणाला हा भूखंड देण्यात आला याबाबत माहिती घेऊन कारवाई केली जाणार आहे.
>
> डॉ.अमोल पालवे, सहाय्यक आयुक्त, बेलापूर विभाग

---00---

> एकीकडे पामबीच मार्गालगत पालिका मुख्यालय व दुसरीकडे एनआरआय पोलीस ठाणे असताना जेसीबी लावून झाडे तोडण्याचा प्रकार घडलेला आहे. मुळातच हा परिसर कांदळवन बफर झोन असताना येथे झाडे कशी काय तोडण्यात आली. पालिका व पोलीस विभाग करतो तरी काय?
>
> सिध्द विद्या, याचिकाकर्ती

# छत्रपती संभाजी महाराजांना मुख्यमंत्र्यांकडून अभिवादन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई : छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानभवनात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पणन मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री पंकज भोयर, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री योगेश कदम, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह विधीमंडळ सदस्य, वरिष्ठ अधिकारी यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

## संक्षिप्त

### कल्याण स्टेशन परिसरात वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या तिघांना अटक

### ९ महिलांची पोलिसांनी केली सुटका

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण स्टेशन परिसरात वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या तिघांना महात्मा फुले पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या तिघांपैकी दोन महिला असून एक पुरुष आहे. अटक आरोपींना कल्याण न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिघांना १२ मार्च पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. वेश्या व्यवसायातून ९ महिलांची सुटका करण्यात आली आहे. या ९ महिलांना उल्हासनगरातील शांतीसदन या महिला वस्तीगृहात ठेवण्यात आले आहे.
अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे तौफीक हिमायद सैय्यद उर्फ टोप्या, सुमय्या अब्दुल रेहमान शेख, रिहना ख्वाजा शेख अशी आहेत. यापैकी तौफीक हा उल्हासनगरचा रहिवासी आहे. तर सुमय्या ही कल्याणच्या नांदिवली परिसरात राहते. रिहाना ही अंबरनाथच्या झोपडपट्टीत राहते. स्टेशन परिसरात नव्या एसटी डेपोच्या इमारतीचे काम सुरु आहे. या ठिकाणी आरोपी हे नऊ महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत होते. याची माहिती महात्मा फुले पोलिसांना मिळताच त्यांनी त्याठिकाणी छापा टाकला. महात्मा फुले पोलिसानी पोलिस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरिक्षक ज्ञानेश्वार साबळे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

### रयतच्या उत्तर विभागीय सल्लागार पदी शिवाजीराव औटी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वडझिरे - वडझिरे चे माजी सरपंच, साखर कामगार नेते व वडझिरे येथील जनसेवा विद्यालयाचे माजी विद्यार्थी शिवाजीराव औटी यांची राज्यात शैक्षणिक क्षेत्रात सर्वात मोठ्या असलेल्या सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या अहिल्यानगर उत्तर विभागाच्या सल्लागार पदी निवड करण्यात आली आहे .
कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार संस्थेच्या विकासासाठी भरीव योगदान दिल्याबद्दल संस्थेने औटी यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांची रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय अध्यक्ष, आ . आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उत्तर विभागाच्या सल्लागार मंडळावर निमंत्रित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे .
या निवडीबद्दल नूतन सल्लागार शिवाजीराव औटी यांचे खा . डॉ . निलेश लंके, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य कार्यकारिणी सदस्य व नगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील व इतरांनी अभिनंदन केले आहे .

# मुरबाड तालुक्यात ‘पाणी योजना राबवा पैंसा लांबवा’

## तीन लाखांच्या पाण्याच्या टाकीत पाणी येणार कोठून?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : मुरबाड मध्ये जलजीवन मिशनचे अगोदरच बारा वाजले असताना, आता फांगणे गावात पेजवाडी रस्त्यावर १५व्या वित्त आयोगातून अंदाजे ३लक्ष रुपये खर्चून बांधलेल्या कठडा आणि पाण्याच्या टाकीसाठी नळ कनेक्शन किंवा बोअरवेल चे कनेक्शन च नसल्याने या टाकीत पाणी येणार कोठून?असा प्रश्न विचारला जात असून या भागातील महिलांना ऐन कडाक्याच्या उन्हात पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे, त्यामुळे गावात योजना राबवा, पैसा लांबवा, असेच सुरू असल्याचा आरोप भोरांडे ग्रुप ग्रामपंचायतीचे माझी सदस्य काळुराम आंबो केदार व सामाजिक कार्यकर्ते अनंता मारुती केदार यांनी केला आहे.
हवामान खात्याने उन्हाचा अर्लट जारी केला आहे, कामाशिवाय कोणीही घराबाहेर पडू नये असा इशारा दिला आहे, परंतु अशाही परिस्थितीत मुरबाड तालुक्यातील फांगणे, पेजवाडी गावातील महिला पाण्यासाठी वणवण भटकत आहेत, याचे कारण म्हणजे पाणी योजनेत जिरवलेला पैसा हे आहे, अगोदरच जलजीवन मिशनचे८७लाख रुपयांची योजना येवूनही ग्रामस्थांना दुषित पाणी प्यावे लागत आहे, यातच पेजवाडी रस्त्यावर पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद ठाणे यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत भोरांडे अंतर्गत फांगणे येथे १५व्या वित्त आयोगातून१०टक्के टाईट फंड(२५१५-२६३७)जिप स्तर अंदाजित रक्कम३लक्ष खर्चून कठडा व त्यावर प्लास्टिक ची टाकी बसवून तिला ४नळ जोडण्यात आले आहेत. हे काम गौरव श्याम राऊत मु खापरी या ठेकेदारांने केल्याचे लावलेल्या पाटीवरुन दिसून येते, परंतु या टाकीत पाणी येणार कोठून? हे कळेनासे झाले आहे, कारण टाकीच्या बाजूला केवळ एक पाईप जमिनीत पुरलेली आहे, तिला ना नळ कनेक्शन, ना बोअरवेल चे कनेक्शन?की ठेकेदार नळ जोडणीच विसरला?या एकूणच प्रकारामुळे या योजनेत कसा पैसा जिरवला असेल?याची कल्पना येते. तर ही टाकी, कठडा व४नळ यासाठी खरेच३लाख रुपये खर्च झाला असेल का?असा प्रश्न ग्रामपंचायतीचे माझी सदस्य काळुराम केदार, व सामाजिक कार्यकर्ते अनंता केदार यांनी यांनी उपस्थित केला आहे.



त्यामुळे मुरबाड, शहापूर तालुक्याचा विचार केला तर पाणी योजनामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत आहे, याबाबत जिल्हा परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे डी ई सासे यांना विचारले असता ते म्हणाले की, माझ्याकडे दोनच दिवसापूर्वी कार्यभार दिला आहे, तर मुरबाड पंचायत समितीचे या विभागाचे श्री बनकरी यांना संपर्क साधून ही त्यांच्या कडून प्रतिसाद मिळाला नाही,

# कल्याण पश्चिमेत प्रशासकीय भवन उभारा

### - माजी आमदार नरेंद्र पवार

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर : नागरिकांच्या त्रासाचा आणि सोयीचा विचार करता कल्याण पश्चिमेत सर्वच सरकारी कार्यालये एकाच इमारतीमध्ये असणारे प्रशासकीय भवन उभारण्याची मागणी भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केली आहे. या मागणीसंदर्भात पवार यांनी नुकतीच राज्याचे महसूल मंत्रीचंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेत या प्रशासकीय भवनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची विनंतीही केली.
कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचा विचार करता येथील रेल्वे स्टेशन परिसरात पोलीस स्टेशन, तहसीलदार कार्यालय, न्यायालय, पंचायत समिती कार्यालय अशी सर्वच प्रमुख शासकीय कार्यालये आहेत. या सर्व कार्यालयांमध्ये आपापल्या कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची संख्या अतिशय मोठी आहे. त्यातच कल्याण हे रेल्वेवरील महत्त्वाचे जंक्शन असल्याने त्याद्वारे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची रोजची संख्याही लाखांच्या घरात असल्याचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास आणून दिले. परिणामी इतक्या मोठ्या नागरिकांच्या येण्या जाण्याचा ताण इथल्या रस्त्यावर, वाहतुकीवर आणि वाहतुकीच्या साधनांवर येत असून कोणत्याही वेळी हा परिसर गर्दी, वाहतूक कोंडी आणि हजारो वाहनांच्या वाहनांनी गजबजलेला असतो. या पार्श्वभूमीवर एकमेकांच्या जवळ असणारी मात्र वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली ही सर्व कार्यालये एकाच प्रशासकीय भवनाच्या इमारतीमध्ये समाविष्ट केली तर नागरिकांची मोठी सोय तर होईलच, परंतु त्याचसोबत कल्याण स्टेशन परिसर वाहतूक कोंडीमुक्त होऊन इतर लोकांनाही त्याचा त्रास होणार नसल्याचा मुद्दाही नरेंद्र पवार यांनी यावेळी अधोरेखित केला.
या सर्व बाबींचा विचार करता कल्याण पश्चिमेसाठी नव्या प्रशासकीय भवनाला मान्यता देण्यासह त्यासाठी निधीही उपलब्ध करून देण्याची मागणी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे यावेळी केली आहे. त्यावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असल्याचेही पवार यांनी यावेळी सांगितले.



नरेंद्र पवार यांनी घेतली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट

# मुरबाडमध्ये लेफ्टनंट शामली जाधवचे उस्फूर्त स्वागत



• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : भारतीय सैन्य दलातील लेफ्टनंट पदाचे प्रशिक्षण पूर्ण करून मुरबाड येथे आलेल्या श्यामली विजय जाधव या तरुणीचा सोमवारी १० मार्च २०२५ रोजी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला
वैश्य समाज हॉल येथे झालेल्या सत्कार समारंभात ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार, मुरबाड तालुका कुणबी समाज संघटनेचे अध्यक्ष गणपत विशे, ठाणे जिल्हा आरपीआय अध्यक्ष रवींद्र चंदने, मुरबाड नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्ष शितल तोंडलीकर यांनी शामलीचा गौरव केला व जाधव कुटुंबीयांचे अभिनंदन केले
मुरबाड शहरात श्यामलीचे आगमन झाल्यानंतर ग्रामस्थांनी मिरवणूक काढली संतोषी माता मंदिर ते वैश्य समाज हॉल अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली या मार्गावर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले गावामध्ये ठिकठिकाणी श्यामलीचे उस्फूर्त स्वागत करण्यात आले
मिरवणुकीत माजी नगराध्यक्ष मुकेश विशे, नगरसेवक विनोद नार्वेकर, नगरसेविका मधुरा सासे, रवीना राव, माजी नगरसेवक रवींद्र देसले, मनसे अध्यक्ष देवन जाधव, मुरबाड तालुका शिवसेना प्रमुख संतोष जाधव, सामाजिक कार्यकर्ते हरेश पुरोहित, श्यामली ची आई भाग्यश्री विजय जाधव त्यांचे कुटुंबीय यांचे सह अनेक सामाजिक व राजकीय कार्यकर्ते तसेच सर्व पत्रकार मंडळी सहभागी झाले होते.

# केडीएमसी ऑनलाईन लिंक द्वारे नोंद तक्रारींची जनता दरबारात घेतली जाणार दखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विविध विभागांमधील दैनंदिन प्रशासकीय कामाकाजाबाबत नागरीकांकडून विविध तक्रारी प्राप्त होत असतात. प्राप्त तक्रारींचे यथायोग्य निराकरण करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. मात्र महापालिकेच्या विविध विभागातील कामकाज पार पाडित असतांना असे निदर्शनास आले आहे की, काही नियमित तक्रारदार हे प्रथमतः एखाद्या विषया संदर्भात तक्रार अर्ज दाखल करतात. तक्रारदार हा वेगवेगळ्या शासनाकडील विविध सेवा अंतर्गत लोकशाही दिन, आपले सरकार, पीजी पोर्टल, ई-मेल तसेच सोशल मिडिया इत्यादी माध्यमाचा वापर करून महापालिकेच्या विविध विभागाशी संबंधित अनेक स्वरूपाच्या तक्रारी वारंवार दाखल करतात.
या तक्रारी विविध माध्यमांतून प्राप्त होत असल्याने एकच तक्रार वारंवार येते. तसेच प्राप्त तक्रारींचे प्रभावी निराकरण करण्यास अडचण येते. परिणामी नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. तसेच महापालिकेची प्रतिमा खालावण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी केडीएमसी ॲपव्दारे, ऑनलाईन लिंक द्वारे नोंद तक्रारींची दखल जनता दरबारात घेतली जाणार आहे.
प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी दुपारी ३ ते ५ वेळेत आयुक्त कार्यालयात 'जनता दरबार' आयोजित करण्यात येतो. 'जनता दरबार' मध्ये तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असावी आणि महानगरपालिकेच्या तक्रार निवारण संबंधी KDMC २४ X ७ या ॲपव्दारे, ऑनलाईन लिंक द्वारे तक्रार नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्यायोगे, प्राप्त तक्रारींचा विहित मुदतीत निपटारा करणे शक्य होईल. या ॲपव्दारे प्राप्त तक्रारी आल्यास त्याबाबत कारवाई, निपटारा करण्यात येणाऱ्या अडचणी पहाता सर्व प्रकारच्या तक्रारी KDMC २४ X ७ ॲपवर वर्ग करून सोडवण्याबाबत सर्व विभागांना निर्देशित करण्यात आले आहे. तसेच सर्व नागरिकांनी या गोष्टीची दखल घेऊन KDMC २४ X ७ ॲपचा पुरेपूर वापर करून महापालिकेस सहकार्य करावे.
यापुढे, जनता दरबारात या ॲपव्दारे प्राप्त तक्रारीच केवळ विचारात घेतल्या जातील, तसेच यापुर्वीअंतिमतः निकाली काढलेल्या तक्रारी जनता दरबारात आल्यास विचारात घेतल्या जाणार नाहीत. नागरिकांच्या सोयीकरिता तक्रार दाखल करणे सोपे व्हावे म्हणून विशेष मदत कक्ष देखील कार्यान्वित केला जाणार असल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी दिली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

# उल्हासनगरात आशा वर्कर्सवर माथे फिरूचा हल्ला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर : क्षयरोग आणि कुष्ठरोगाचे सर्वेक्षण करतांना दोन आशा वर्कर्स वर एका माथे फिरूने हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. यामुळे, अल्प मानधनावर काम करणाऱ्या आशा वर्कर्सच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलाय. या घटनेमुळे इतर आशा वर्कर्स मध्ये भितीचे वातावरण पसरले असून प्रशासन मात्र यात बघ्याची भूमिका घेतांना दिसून आली.
दुपारच्या सुमारास उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने क्षयरोग आणि कुष्ठरोगाचे सर्वेक्षण करण्या करिता अंजली गडपायले आणि सुषमा कदम या आशा वर्कर्स उल्हासनगर कॅम्प नंबर ४ मधील भरत नगर या झोपडपट्टी परिसरात फिरत होत्या. त्या नामक आकाश वानखेडे या व्यक्तीच्या घरावर गेले असता, दार वाजवल्याने संतापलेला माथेफिरू हा महिलांवर धावून गेला व अर्वाच्य भाषेत शिवीगाळही केली. याने सुषमा कदम यांच्या केसांना धरून फरशिचा तुकडा डोक्यात मारला. तिचा बचाव करण्यासाठी गड पायले पुढे गेले असता, त्यांच्याही खांद्यावर नखांनी ओरडून त्यांचे डोके भिंतीवर आपटून जखमी केले.
यानंतर ,दोन्ही आशा वर्कर्सने शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात जाऊन उपचार घेतले व तेथे प्राथमिक पोलीस तक्रार नोंदविण्यात आलीय. मनपा वैद्यकीय अधिकारी मोहिनी धर्मा यांनी सांगितले की, " आशा वर्कर्स यांनी घाबरून जाऊ नये. प्रशासन आशा वर्कर्स यांच्या सोबत आहे. याप्रकरणी, विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आशा वर्कर्स या सामाजिक आणि नागरिक हितासाठी तुमच्या दारात येतात महिला म्हणून त्यांची सुरक्षा करणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे. तरी अशा प्रकारचे हल्ले प्रशासन यापुढे खपवून घेणार नाही ".



# सुरेश खोसे पाटील यांचे पत्रकारितेत मोठे योगदान - खा.डॉ.निलेश लंके

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पारनेर - पारनेर तालुक्यात विविध वृत्तपत्रांसाठी पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील यांचे पत्रकारिता व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि पारनेर तालुक्यासाठी मोठ्या योगदान असल्यामुळे त्यांची राज्य पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारिणी त निवड होणे , ही तालुक्याच्या दृष्टीने भूषणावह बाब असल्याचे गौरवोद्गार नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ . निलेश लंके यांनी काढले .
१९९२ पासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले व आज अखेर राज्यातील अनेक वृत्तपत्रांसाठी पारनेर तालुक्यात पत्रकार म्हणून काम करत असलेले व दैनिक पारनेर समर्थ चे संपादक सुरेश खोसे पाटील यांची नुकतीच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारिणी वर निवड करण्यात आली , त्यानिमित्त त्यांचा खा . डॉ . निलेश लंके यांच्या कार्यालयात शाल , पुष्प गुच्छ देऊन व पुष्प हार घालून सन्मान करण्यात आला . त्यावेळी खा . डॉ . लंके पुढे म्हणाले की , पत्रकार हा लोकशाही चा चौथा स्तंभ आहे . समाजातील दुर्लक्षित प्रश्नांना इमाने इतबारे वाचा फोडण्याचे काम आपल्या लेखनी व्दारे पत्रकार असतात . माझ्या राजकीय क्षेत्रातील प्रगतीस पारनेर तालुक्यातील पत्रकारांचे फार मोठे योगदान आहे . त्यामुळे पत्रकारांचे कार्य मला जवळून परिचित आहे . तद्वतच सुरेश खोसे पाटील आपल्या ग्रामीण तालुक्यातून पत्रकारितेच्या लेखनीव्दारे सातत्याने स्वतः ला झोकून देऊन काम करत असतात , त्यांनी माझ्या महत्वाच्या राजकीय कारकिर्दीतील अलिकडच्या ५ महिन्यात १०० बातम्या प्रसिद्ध करून पत्रकारितेची चुणूक दाखवून दिली आहे , त्यांचे कौतूक करावे , तेवढे कमीच आहे . त्यांची राज्य कार्यकारिणीवर झालेली निवड ही पारनेर तालुक्याच्या दृष्टीने नक्कीच भूषणावह आहे . त्यांचा सन्मान करणे , हे लोकप्रतिनिधी या नात्याने माझे कर्तव्यच आहे , असे गौरवोद्गार ही खा . डॉ . निलेश लंके यांनी काढले .
यावेळी सत्काराला उत्तर देताना पत्रकार सुरेश खोसे पाटील यांनी पत्रकार व राजकीय नेते हे नाण्याच्या दोन बाजू असून त्यांच्या तील सुसंवाद समाजाच्या दृष्टीने फार महत्वाचा असतो . पत्रकार हा समाजाचे आपण काही तरी देणे लागतो , या भावनेतून अंतकारणातून काम करत असतो , राजकीय नेत्यांनी केलेल्या सन्मानामुळे पत्रकारां ना काम करताना जबाबदारी वाढते , असे ही पत्रकार खोसे पाटील म्हणाले .
यावेळी अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते .



**खा . डॉ . निलेश लंके यांनी राजकीय क्षेत्रात ५ महिन्यांमध्ये केलेल्या कामांची १०० बातम्यांच्या माध्यमातून पत्रकार सुरेश खोसे पाटील यांनी राज्यातील वृत्तपत्रांमधून दखल घेतलेल्या बातम्यां ची कात्रण फाईल सुपुर्द केल्याने खा . डॉ . लंके देखील आश्चर्य चकित झाले व माझ्या राजकीय जीवनातील माझ्या कामांची बातम्यांच्या माध्यमातून दखल घेऊन माझ्या कामांना प्रसिद्धी दिल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.**

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024